ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 2 | OCTOBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

विदर्भात यादवांचा सत्तेचा विसतार व उत्कर्ष एक दृष्टीक्षेप

प्रा. डॉ. प्रशांत प्रल्हादराव कोठे
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महा.
आकोट जि. अकोला.

प्रस्तावना :

बाराव्या शतकाच्या अखेरीस देवगिरीच येथे यादवांची सत्ता उदयास आली. त्यांची विदर्भावर सत्ता निर्माण झाली होती. यादवांची माहिती सिंहणाचा पिता जैत्रपाल यापासून मिळते. त्याच्या पराक्रमाचे वर्णन रामटेकच्या लक्ष्मणाच्या देऊळातील लेखावरुन मिळते.[१] त्याने रुद्र आंध्राधिपती, चीड याचा पराभव केला होता. त्याच्यानंतर त्याचा मुलगा सिंहण गादीवर आल्यावर वऱ्हाड जिंकून आपल्या राज्याला जोडला होता. बुलढाणा जिल्ह्यातील अमडापूर येथे एक शिलालेख सापडला आहे (तो मिराशींनी — एपिग्रफिया इंडीका २१, पृ. १२७—१२८ मध्ये प्रकाशित केला)[२] एका कोरीव लेखावरुन सिंहण नंतर त्याचा नातू कृष्ण गादीवर आला असे कळते.[३] त्याच्या काळचा शके ११७७ (१२५४—५५) चा मराठी लेख वऱ्हाडात अमरावतीच्या ईशान्येस २० मैलावर नांदगांव (खंडेश्वर) येथील टेकडीवर खंडेश्वर, देवी व नरसिंह या तीन देवतांचे मिळून एक समान सभामंडप असलेले देवालय आहे. त्याच्या बाहेरील भिंतीवर लेख कोरला आहे. हे देऊळ हेमाडपंती आहे. म्हणजेच रामदेव यादव नृपतीचा प्रधान हेमांद्रि याने प्रचलित केलेल्या शिल्पपद्धतीचे आहे.[४] त्या देवळातील देवाच्या पूजेकरीता फुलाच्या लाखोल्या वाहाव्या म्हणून कित्येक गद्याणके (सोन्याची नाणी) दिल्याचा उल्लेख आहे. कृष्णाचा आणखी एक लेख चांदा जिल्ह्यातील मार्कंडीस सापडला आहे.[५]

कृष्णाचा मुलगा रामचंद्रराय हा लहान असल्यामुळे त्याचा भाऊ महादेव हा देवगिरीच्या गादीवर आला. त्याने उत्तरकोकणाधिपती शिलाहर वंशीय सोमेश्वरचा उच्छेद केला.[६] महादेवानंतर त्याचा पुत्र आमण गादीवर बसला. त्याच्यानंतर कृष्णाचा मुलगा रामचंद्राने त्याच्याकडून क्रांती करुन गादी हिसकावून घेतली याचे वर्णन महानुभाव वाङ्मयाच्या लीळाचरित्रात आले आहे.[७] तो श्री ज्ञानेश्वराचा समकालीन होता. त्याच्याच काळात रामटेक येथील लक्ष्मणाच्या देवळाकरिता काही (बहुधा त्याचा जीर्णोद्धार) केल्याचा उल्लेख त्या देवळाच्या गर्भगृहात लावलेल्या शिलालेखात आहे. त्यातच रामचंद्रदेव हा विलासात रममाण झाला असा उल्लेख आहे.[८] त्याच्याच काळातील भंडारा जिल्ह्यातील लांजी येथे एक तत्कालीन भग्न शिलालेख सापडला आहे. ज्यात वज्राकराच्या राज्याचा समूळ उच्छेद रामचंद्राने केला असे म्हटले आहे. तो गडचिरोली जिल्ह्यातील वैरागड होय. या ठिकाणी मुसलमानी काळापर्यंत हिऱ्याच्या खाणी होत्या. म्हणून प्राचीन लेखात याला वज्र किंवा वज्रागड असे म्हटले आहे (ऐनी—अकबरी, नारटेकृत भाषांतर, पृ. २२९—३०)[९]

सिंघणचा सेनापती खोलेश्वर याने विदर्भात अनेक देवळे बांधली व अग्रहार स्थापले. हे सर्व वर्णन आंबे येथील शिलालेखात आले आहे. पण विदर्भाचा पूर्व भाग प्रथम रामचंद्र यादवाच्या काळीत अंमलाखाली आला असे दिसते. त्याचा हस्तीसेनाध्यक्ष हेमांद्री याने झाडी मंडल जिंकल्याचा कोरीव लेखात उल्लेख आहे. या पूर्वेकडील प्रदेशाला झाडीमंडल म्हणत.[१०] रामचंद्राने वाराणसी म्लेच्छ राजांच्या अंमलापासून मुक्त केली आणि तेथे शार्ङ्गपाणीचे सोन्याचे देवालय बांधले असे म्हटले आहे. सन १२८५ ते १२९० या काळात ही स्वारी त्याने केली असावी. त्यानंतर १२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीवर स्वारी करुन तिचा वचपा काढला असे दिसते. याचे वर्णन आंबे शिलालेखात आले आहे.[११]

विंध्यपर्वत आणि नर्मदा ओलांडून तो विदर्भात एलिचपूर या यादवांच्या राज्याच्या उत्तर सीमेजवळ आला. ''त्याने एलिचपूर जिंकले. तेथे दोन दिवस सैन्याला विश्रांती दिली.''[१२] यावेळी एलिचपूर येथे यादवांचा मांडलीक रामदेवराय दरणा कारभार करीत होता.[१३]

''एलिचपूरवरुन त्याने विद्युतगतीने देवगिरीच्या प्रवेशद्वारावर धडक दिली.''[१४] तेथे रामदेवराव यादव नावाचा राजा राज्य करीत होता. ''त्याला अल्लाउद्दीनच्या आगमनाची वार्तासुद्धा नव्हती.''[१५] ''तो देवदर्शनास गेला असता त्याला ही बातमी मिळाली. त्या वेळी त्याची फौज राजपूत्र सिंधनदेवाच्या (शंकरदेव) नेतृत्त्वाखाली सीमावाद सोडविण्यासाठी दूर दक्षिणेत गुंतली होती.''[१६] तरी त्याने अल्लाउद्दीनला तोंड देण्याची तयारी केली. अल्लाउद्दीनने किल्ल्याला वेढा दिला. शहरात नाना तऱ्हेचे जुलूम केले. तरी किल्ला हस्तगत होईना. तेव्हा ''मी फक्त लहानशी फौज घेऊन पुढे आलो आहे. बादशाहाची मोठी फौज मागाहून येत आहे''[१७] अशी थाप अल्लाउद्दीनने मारली. हे ऐकून रामदेवराव यादवाने घाबरुन एकदम पुष्कळ द्रव्य देऊन अल्लाउद्दीनशी तह केला. त्यानंतर शंकरदेवाने हा तह नाकारुन युद्ध केले. त्यात पराभव झाल्याने दुसरा काहीच उपाय न राहून त्याच्या अधिपत्याखालील वऱ्हाडातील एलिचपूर व आसपासचे प्रांत आणि अमाप द्रव्य देऊन त्याने कसाबसा बचाव करुन घेतला.[१८] यावरुन त्या वेळी एलिचपूर हा मोठा सुभा असावा व त्याचा महसूल मोठा असावा असे दिसते. यावेळी वऱ्हाड यादवांचा सधन सुभा असावा कारण यादवांकडून येथे महसुल अधिकारी ठेवला जात होता.

अल्लाउद्दीन खिलजी देवगिरीवरुन परत जातांना एलिचपूरला आला. येथे मुक्काम करुन शहराचा ताबा घेतला व आपला अधिकारी त्या ठिकाणी नेमला. ''या वेळी त्याने दुल्ला रहिमान शहा याची कबर बांधण्याकरिता पुष्कळ द्रव्य दिले.''[१९]

''अल्लाउद्दीन परत दिल्लीला गेल्यावर, रामदेवरायने एलिचपुर येथे पुन्हा आपले अधिकारी नेमले व काही दिवस नियमाने खंडणीही दिल्लीस पाठविली. परंतु पुढे—पुढे खंडणी पाठविणे बंद केले.''[२०]

रामदेवरायचा शेवटचा ताम्रपट इ.स. १३१० चा पुरुषोत्तमपुरी येथे सापडला असता त्यात त्याने काही गांवे दान दिली व त्याने त्याचा अग्रहार करुन तो काही ब्राम्हणांस दिला असा निर्देश आहे.[२१] त्यानंतर तो लवकरच वारला असावा कारण इ.स. १३१२ मध्ये देवगिरीचा राजा खंडणी देत नाही अशी बातमी अल्लाउद्दीन खिलजीला कळली असे मुस्लीम इतिहासकारांनी म्हटले आहे. हा राजा रामचंद्रदेवचा पुत्र शंकरदेव असावा.[२२] शंकरदेवने दिल्लीचे वर्चस्व झुगारुन देऊन स्वतंत्र्यपणे कारभार करु लागला त्यामुळे इ.स. १३१३ मध्ये मलिक काफूरने देवगिरीवर स्वारी केली. त्यात शंकरदेव मारल्या गेला व देवगिरीचे राज्य दिल्ली राज्याला जोडले. परंतु हे अल्लाउद्दीनला पसंत न पडल्यामुळे देवगिरीचा कारभार, हरपालदेव यादवाकडे सोपवून मलिक दिल्लीला गेला.[२३] सन १३१८ मध्ये मुबारक खिलजी दक्षिणेत फौज घेऊन चालून गेला. रामदेवरावचा जावई हरपळदेव देवगड (देवगिरी) येथे स्वतंत्रपणे राज्य करु लागला होता. त्यास त्याने जिवंत सोलून हालहाल करुन ठार मारिले. आणि दक्षिणेत मुसलमानी अंमल कायमचा बसला.[२४] अशा रीतीने मुस्लीम सत्तेच्या आक्रमणाला प्रथम वऱ्हाडात बळी पडले ते एलिचपूर होय.

यादवांच्या राजवटीतील विदर्भाचा उत्कर्ष:

देवगिरीच्या यादवांच्या राजवटीत संस्कृत व मराठी वाङ्मयाला उदार राजाश्रय मिळाला. सुप्रसिद्ध हेमांद्रि पंडीत हा महादेव व रामदेव यांच्या कारकीर्दीत 'श्रीकरणाधिप' म्हणजे सचिवालयाचा प्रमुख या उच्च पदावर होता. त्याने 'चतुवर्ग चिंतामणि' नामक बृहत्कोश रचला होता. याचे व्रतखंड, दानखंड, तीर्थखंड व मोक्षखंड असे चार खंड आहेत. याशिवाय परिशेषखंड म्हणून पाचवे खंड आहे. हेमांद्रिचा आश्रित बोपदेव याने व्याकरण, वैद्यक, तिथिनिर्णय, साहित्य, भागवत वगैरे विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले होते. याचे मुग्धबोध व्याकरण समजण्यास सोपे असल्याने त्याचा प्रसार अद्यापि बंगाल प्रदेशात चालू आहे. बोपदेवाच्या 'मुक्ताफल' नामक ग्रंथावर हेमाद्रिने टीका लिहिली आहे. तीत बोपदेवाने व्याकरणावर दहा, वैद्यकावर नऊ, ज्योतिषावर एक, साहित्यशास्त्रावर तीन आणि भागवत तत्त्वावर तीन मिळून एकूण सव्वीस ग्रंथ लिहिले होते असे म्हटले आहे. त्यावरुन बोपदेवाच्या प्रचंड ग्रंथसंभाराची कल्पना येईल. बोपदेव हा वर्धा नदीच्या तीरी असलेल्या वेदपद नामक गावचा रहिवासी होता.[२५]

यादवांच्या राजवटीत विदर्भात महानुभाव पंथाचा उदय झाला. यादवांच्या राजवटीत वैदिक धर्मीयांनीही विदर्भात उत्कृष्ट ग्रंथरचना केली होती. मराठीतील आद्य ग्रंथकार मुकूंदराज याचे परमगुरु हरिनाथ याची समाधी वैनगंगेच्या तीरी अंबानगरी (अंभोरे) येथे आहे. मुकूंदराजाची समाधी बैतुलजवळ खेडले या गावाच्या पडक्या किल्ल्यात आहे. मुकूंदराजांनी विवेकसिंधू व परमामृत हे दोन उत्कृष्ट वेदान्तपर ग्रंथ लिहिले.[२६] अशी प्रगती विदर्भात दिसून येते.

विदर्भातील प्रसिद्ध यादव सेनापती खोलेश्वर:

यादवकाली विदर्भीयांनी रणांगणावरही आपल्या शौर्याने कीर्ती संपादन केली होती. यादव नृपति सिंघण याचा सेनापति खोलेश्वर हा मुळचा विदर्भातील होता. त्याचा पिता त्रिविक्रम हा उदुम्बरपंक्ति नामक अग्रहारांत राहत असे. हे उदुम्बरपंक्ति वऱ्हाडातील राणी उमरावती नामक गांव असावे असा तर्क आहे. खोलेश्वराने अनेक विजय मिळविले. त्याचे वर्णन आंबेजोगाई येथील त्याच्या लेखात केले आहे. त्याने चाहंदाधीश्वर (चांद्याचा अधिपति) भोजदेव याचा पराभव केला, कलिंगराजाला रणांगणावर पकडले, वाराणसीच्या (काशीच्या) रामपाल नामक राजाला पिटाळून लावले, नागणाचा शिरच्छेद केला, तोरगलचा किल्ला काबीज केला, गुर्जराना जर्जर करुन भडोचजवळ समुद्रात जयस्तंभ उभारला असे वर्णन त्याच्या लेखात आले आहे. त्यावरुन कर्नाटकापासून उत्तर प्रदेशापर्यंत आणि अरबी समुद्रापासून बंगालच्या उपसागरापर्यंत त्याने आपल्या शौर्याने स्वत:चा दरारा बसविला होता असे स्पष्ट दिसते. त्याचा पूत्र राम हाही पित्याप्रमाणे शूर निघाला, पण गुर्जरांशी नर्मदेकाठी लढतांना तो धारातीर्थी पडला, असे कोरीव लेखात म्हटले आहे.[२७]

खोलेश्वर विदर्भातील असल्याने त्याने या प्रदेशात अनेक धार्मिक कृत्ये केली. तो अचलपूर येथे राहत असतांना त्याने अचलपूरात शार्ङ्धराचे (विष्णूचे) पर्वतासारखे उत्तूंग मंदिर बांधले, पयोष्णीच्या (पुर्णेच्या) तीरावर आपल्या नावे खोलापूर नामक अग्रहार बसविले. तेथे महादेवाचे मंदीर बांधले. हे गाव अद्यापि प्राचीन नावाने विद्यमान आहे.[२८] तसेच वरदातटांत (वर्धेच्या काठी) वऱ्हाडात अनेक मंदिरे, अग्रहार, प्रपा (पाणपोया) व वापी केल्या व अशा रीतीने आपल्या जन्मभूमीचे ऋण फेडले. माहूर येथे रेणुकादेवीचे मंदीर देवगिरीच्या यादवांनी बांधले.[२९]

यादवांच्या राजवटीत विदर्भात संस्कृत व मराठी वाङ्मयाला उदार राजाश्रय मिळाला त्यामुळे साहीत्याच्या श्रेत्रात उन्नती झाली होती, महानुभाव पंथाचा उदय व विकास झाला, विदर्भीयांनी रणांगणावरही आपल्या शौर्याने कीर्ती संपादन केली, अनेक मंदीर बांधले गेले असे दिसुन येते. यादवांची राजवट विदर्भाच्या दृष्टीने संपन्नता असलेला प्रदेश होता. त्या नंतर वऱ्हाड व विदर्भ मुस्लीमांच्या अधिपत्याखली गेला.

संदर्भ ग्रंथ सूची

१) मिराशी वा. वी., संशोधन मुक्तावली सर तिसरा, पृ.क्र. १९३.
२) कित्ता, सर चौथा, पृ.क्र. १४४.
३) कित्ता, सर चौथा, पृ.क्र. १५२.
४) कित्ता, सर चौथा, पृ.क्र. १४२.
५) कित्ता, सर तिसरा, पृ.क्र. ७३.
६) कित्ता, सर चौथा, पृ.क्र. १५३.
७) कित्ता, सर चौथा, पृ.क्र.१५३.
८) काळे या. मा., नागपूरकर भोसल्यांचा इतिहास, पृ.क्र. ४५.
मिराशी वा. वी., संशोधन मुक्तावली सर तिसरा, पृ.क्र. १९४.
९) मिराशी वा. वी., संशोधन मुक्तावली सर चौथा, पृ.क्र.१५५.
१०) कित्ता, सर चौथा, पृ.क्र. १५५.
११) कित्ता, सर चौथा, पृ.क्र. १५६
१२) केतकर श्री. व्यं., महाराष्ट्रीय ज्ञानकोष, वि.१९, पृ.क्र. (व) ११५.
काळे या. मा., वऱ्हाडचा इतिहास, पृ.क्र. ८१.
१३) महाजन द. बा., 'अचलपूर इतिहासाचा मागोवा', तरुण भारत, ६ फेब्र.१९७६.
१४) Rizvi S.A.A., The Wonder that was India, Vol. II, p. no. 36.
१५) काळे या. मा., वऱ्हाडचा इतिहास, पृ.क्र. ७७,८१.
१६) Mujumdar R. C., Raychaudhari, Kalikinkar, An Advanced History of India, Part II, p. no. 298.
१७) सरदेसाई गो. स., मुसलमानी रियासत खंड—१, पृ.क्र. ११५.
१८) कित्ता, पृ. ११५.
जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश, खंड १, पृ.क्र. ५२७.
१९) कोलारकर श. गो., विदर्भाचा इतिहास, पृ.क्र. ९६.
देशपांडे य. खु., एलिचपूर वऱ्हाडची जुनी राजधानी, पृ.क्र. ९७.
२०) काळे या. मा., वऱ्हाडचा इतिहास, पृ.क्र. ८२.
कोलारकर श. गो., विदर्भाचा इतिहास, पृ.क्र. ९७.
देशपांडे य. खु., एलिचपूर वऱ्हाडची जुनी राजधानी, पृ.क्र. २८.
२१) कित्ता, सर तिसरा, पृ.क्र. ७३.
२२) कित्ता, सर चौथा, पृ.क्र. १५७.
२३) सरदेसाई गो. स., मुसलमानी रियासत खंड—१, पृ.क्र. १२९.
२४) सरदेसाई गो. स., मुसलमानी रियासत खंड—१, पृ.क्र. १३८.
२५) मिराशी वा. वी., संशोधन मुक्तावली सर तिसरा, पृ.क्र. ७३,७४.
२६) कित्ता, सर चौथा, पृ.क्र. ११९.
२७) कित्ता, सर तिसरा, पृ.क्र. ७५,७६.
२८) महाजन, द. बा., अचलपूर इतिहासाचा मागोवा, तरुण भारत, ६ फेब्रुवारी १९७६.
२९) जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश, खंड १३, पृ.क्र. ४८२, ४८३.
काळे या. मा., वऱ्हाडचा इतिहास, पृ.क्र. ७४.